Session : 7

Date : 16/09/25

News : loksayadri

दैनिक लोक सह्याद्री

dailyloksahyadri www.loksahyadri.com dailyloksahyadri@gmail.com epaper.loksahyadri.com\ 9975189132

# एस.व्ही.सी.एस.प्रशालेत सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा उपक्रम

**दैनिक लोकसह्याद्री**

सोलापूर/प्रतिनिधीः एस. व्ही. सी. एस. प्रशाला एमआयडीसी येथे अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर व क्वीक हील फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमामध्ये विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुलातील रत्नप्रभा चंदनशिवे व श्रद्धा मोहिते या विद्यार्थिनींनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर सेमिनार दिले. या सेमिनारमध्ये त्यांनी आजच्या ऑनलाईन युगामध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या फसवणुकीबद्दल माहिती दिली. या माहितीमध्ये ओटीपी कोणास सांगू नये, अनोळखी नंबर वरून आलेल्या फोनची पडताळणी करणे, व्हाट्सअप व इतर सोशल मीडिया वरून आलेल्या मेसेजेस व लिंकची शहानिशा करणे,हॅकिंग, ऑनलाइन स्कॅम डिजिटलला कसे ओळखावे, स्ट्राँग पासवर्ड कसा बनवावा आणि आपले सॉफ्टवेअर कसे सुरक्षित ठेवावे याची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली,मोबाईल, कॉम्प्युटर, लॅपटॉप इत्यादी साधनावर अधिकृत अँटीव्हायरसचा वापर करावा असा सल्ला त्यानी दिला. या कार्यक्रमास प्रशालेचे मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे, उपमुख्याध्यापक धनंजय नकाते, पर्यवेक्षक संतोषकुमार तारके, धानया स्वामी, बसम्मा सोनटक्के आदी उपस्थित होते. शेवटी प्रशालेच्या वतीने विद्यापीठाच्या या विद्यार्थिनींचे आभार मानण्यात आले.

